दै. सकाळ दि. 13/10/2019

दै. सकाळ दि. 13/10/2019

# तेलंगणा सीमेवर पावणे चार लाख जप्त

- एस.एस.टी. पथकाची कारवाई
- रोकड कुणाची, कुणासाठी आणल्याची चर्चा

**भोकर/ प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या एस.एस.टी. पथकाने तेलंगणा सीमेवरील रहाटी तपासणी नाक्यावर शनिवारी दुपारी चारचाकी वाहनातून तब्बल ३ लाख ७० हजार रुपयाची रोकड पकडली आहे. ही रक्कम नेमकी कुणाची वा कुठे नेण्यात येत होती, ही बाब अद्याप स्पष्ट होवू शकली नाही. निवडणूकीच्या रणधुमाळीत वाहनात रक्कम आढळून आल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अनुचित प्रकारावर आळा घालण्यासाठी तालुक्यातील तेलंगणा सीमेवर नियुक्त स्थीर सर्वेक्षण पथकातील पोहेकाँ राठोड, दाढे, पाटील यांनी केलेल्या तपासणीत तेलंगणातून म्हैसा मार्गे भोकरकडे येत असलेल्या मारुती ओमीनी कार क्र. टीएस १६ टीएफ ८५०३ ची तपासणी करुन चौकशी केली. संगम पोशट्टी चिन्नाबालय्या (रा. बालगोट मंडळ श्रीकोंडा जिल्हा निजामाबाद, तेलंगणा राज्य) हे निजामाबादहून मुदखेडला कारमधून ३ लाख ७० हजार रुपये घेऊन जात असल्याचे समजले. चौकशीदरम्यान ते रक्कमेबाबत समाधानकारक खुलासा करु शकले नाहीत. त्यामुळे पथक प्रमुख जी.एल. रामोड यांना तात्काळ पाचारण करुन पंचनामा करण्यात आला. निवडणूक काळात एस एस.टी. पथकाच्या कारवाईने राजकीय मंडळींचे धाबे दणाणले आहेत.



दै. सकाळ दि. 13/10/2019

# तीन लाख सत्तर हजारांची रोकड जप्त

## भोकर तेलगंणा सीमेवर स्थिर सर्वेक्षण पथकाची कार्यवाही

**भोकर ता.१२ (बातमीदार)** : सध्या विधानसभा निवडणूकीची धामधूम सुरू असून निवडणूक विभागाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. शनिवारी (ता.१२) सकाळी सव्वादहा वाजेच्या सुमारास तेलगंणा सीमेवरील रहाटी तपासणी नाका येथे स्थिर पथकाने मारोती ओमीनी वाहनातील सुमारे तीन लाख सत्तर हजार रूपयांची रोकड जप्त केली आहे.

निवडणूक विभागाकडून मिळालेली माहिती अशी, निवडणूक आचारसंहिता सूरू असून प्रशासनाच्या वतीने विविध ठिकाणी कायदा सुव्यवस्था सूरळीत रहावी म्हणून दक्षता घेतली जात आहे. शनिवारी सकाळी येथील स्थिर सर्वेक्षण पथकाचे प्रमूख जी.एल.रामोड व पोलिस कर्मचारी श्री.राठोड, श्री.दाडे, श्री.पाटील, भोकर-म्हैसा रस्त्यावर असलेल्या तेलगंणा तपासणी नाक्यावर मारोती ओमीनी क्रमांक (टिएस १६ टिएफ.८५०३) वाहन निजामाबादहून मूदखेडकडे जात असताना याची तपासणी केली असता वाहनात संगम पोशट्टि चिन्हा बालय्या (रा.वालगोट मंडळ श्रीकोंडा जिल्हा निजामाबाद) यांच्याकडील पिशवीत सुमारे तीन लाख सत्तर हजार रूपये रोकड आढळून आल्याने जप्त केली. सदरील रोकडबाबत चौकशी सुरू असून याचा खूलासा कार्यवाही केल्यानंतर स्पष्ट होईल, अशी माहिती पोलीस निरीक्षक विकास पाटील यांनी दिली.